नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/05/2023 (सोमवार) सकाळ

# ऑनलाईन फसवणुकीत १०४७८५/— रूपये थांबविण्यात नागपूर ग्रामीण सायबर पोलीस स्टेशनला यश

फिर्यादी यांना नागपूर ते दिल्ली व दिल्ली ते नागपूर अशी फ्लाईट बुक करायची होती म्हणुन ऑनलाईन गुगलवर सर्च करून त्यासंबधित एक पेज ओपण झाला असता, त्यात माहिती भरली. त्यामुळे फिर्यादी यांचे अकांउट मधुन १०४७८५/—रू. डेबिट झाले. दिनांक १७/०५/२०२३ रोजी सायबर टिम हि कळमेश्वर हददीत जनजागृती कार्यक्रम घेणे कामी गेले असता तक्रारदार यांनी त्यांचे सोबत झालेली हकीकत सांगीतली तेव्हा सायबर टिम यांनी तात्काळ दखल घेत कार्यवाही करून तक्रारदार यांचे पैस परत करण्यात सायबर पोलीस स्टेशनला यश आले.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले तसेच सायबर पोलीस स्टेशन येथील पोलीस उप निरीक्षक श्री. निशांत जुनोनकर, पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे तसेच महिला पोलीस हवालदार स्नेहलता ढवळे, पोलीस नायक वर्षा खंडाईत, संगीता गावंडे, संतीश राठोड, पोलीस शिपाई मृणाल राऊत महिला पोलीस शिपाई वैष्णवी पवार यांनी पार पाडली. सर्व जनतेला आव्हान करण्यात येते की, अशा प्रकारच्या ऑनलाईन फ्रॉडला बळी पडु नये.



# जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पोस्टे पारशिवनी :—** यातील फिर्यादी नामे— सौ. रूपाली जितेंद्र पांडे वय २४ वर्ष रा. भामेवाडा त. कुही यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे अप. क्र. २९५/१९ कलम ३०२ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

फिर्यादी व आरोपी नामे— गणेश गोविंदराव बोरकर वय ४० वर्ष, रा. वडोदा ता. कुही हे नातेवाईक असुन आरोपी हा फिर्यादीचा मोठया बहिणीचा पती आहे. फिर्यादी ही आपले माहेरी बारबारी येथे आई वडीलांकडे बाळंतपणाकरीता आली असता फिर्यादीची मोठी बहीण प्रतीभा हिचा आरोपी पती हा घरी आला व त्यांचे सासरचे लोकांना त्याची पत्नी प्रतिभा हिला सासरी कुही येथे का पाठवत नाही याचा राग मनात धरून बोलत असताना यातील फिर्यादीच्या एक महिन्याचा नाव न ठेवलेला मुलगा याला घेवुन आरोपीस समजाविण्याकरीता गेली असता आरोपीने फिर्यादीच्या लहान मुलाला चाकुने भोसकुन जिवानिशी ठार केले.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस निरीक्षक विलास काळे पो.स्टे. पारशिवनी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक २२/०५/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी. जे. अली सा. नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३०२ भादवि मध्ये आजिवन कारावास व ५०००/—रू दंड , दंड न भरल्यास ०१ वर्ष साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी तपासे सा. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सफौ /६९० किशोर निबांळकर पो.स्टे. पारशिवनी यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**